# राष्ट्रीय लोक अदालत

## दिवाणी व फौजदारी न्यायालय-

(विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ (केंद्रीय कायदा) चे कलम १९ नुसार आयोजीत)

निशाणी क्रं. 35

प्रकरण क्रमांक : रे.दि.मु.नं.१२१/२०२५

वादीचे नांव- १ ) श्री.भिमाप्पा बसाप्पा कुंभार

२) श्रीमती वैशाली महादेव कुंभार

३) कु. ओंकार महादेव कुंभार

प्रतिवादीचे नांव- १) श्रीमती शोभा विठ्ठल माळी

२) सौ. सिमा अशोक माळी

३) श्री.सचिन विठ्ठल माळी

४) श्री. रामचंद्र मारूती जगताप

५) श्री.रघुनाथ मारूती जगताप

न्यायालयाचे नांव: - राष्ट्रीय लोकन्यायालय, कवठेमहांकाळ पॅनेल क्रं.१

१) पॅनेल प्रमुख/न्यायीक अधिकारी- मे. श्रीमती नुतन एस. कदम सो,

२) पॅनल सदरस्य/विधीज्ञ - श्री.ॲड. सुरेश डी.बेडगे

दोन्ही पक्षांमधील वाद सामंजस्याने मिटवण्यासाठी प्रस्तुतचे प्रकरण हे आजरोजी राष्ट्रीय लोक अदालत समोर सादर करण्यात आले आहे. उभय पक्षकारांनी या लोक अदालत समक्ष तडजोड केली आहे आणि त्यांच्या तडजोडीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:

**यात वादी व प्रतिवादी नं.१ ते ५ यांचेमध्ये आपआपसात तडजोड व अटी खालीलप्रमाणे–**

१)यातील वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी विरूद्ध निरंतर ताकीदीसाठी व डिक्लेरेशनसाठी दावा दाखल केलेला होता. यातील वादी यांचे मुळ पुरुष कै.बसाप्पा सखाराम कुंभार हे आहेत. ते दि.२२/११/२००१ रोजी मयत झालेले आहेत. त्यांची पत्नी कै. लक्ष्मी ही दि.२२/०७/१९८२ रोजी मयत झालेली आहे. मुळ पुरूष कै.बसाप्पा यांना वादी नं.१ व कै.महादेव ही मुले आहेत. पैकी कै.महादेव हा दि.३१/०८/२०२३ रोजी मयत झालेला आहे. त्यास वादी नं.२ ही पत्नी व वादी नं.३ हा मुलगा हे कायदेशीर सरळ वारस आहेत. तसेच प्रतिवादी यांचे वडील कै. विठ्ठल गंगाराम माळी हे होते. ते दि.०७/०६/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी नं.१ पत्नी व प्र.वादी नं.२ मुलगी व प्र.वादी नं. ३ हा मुलगा हे कायदेशीर सरळ वारस आहेत. प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे वडील कै. विठ्ठल गंगाराम माळी यांनी गट नं. १८९७/३ (सध्याचा गट नं. १५०८/३) मधील १२८.७ चौ.मी. क्षेत्र दि.१३/०२/१९८९ रोजी प्रतिवादी नं. ४ ते ५ यांना विक्री केलेले आहे. दि. १३/०२/१९८९ रोजीच्या खरेदीदस्ताप्रमाणे प्रतिवादी नं. ४ ते५ यांची नावे फेरफार क्र.७५८४ ने गट नं. १८९७/३ (सध्याचा गट नं. १५०८/३) च्या ७/१२ सदरी लागलेले आहे. यातील प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे वडील कै. विठ्ठल गंगाराम माळी यांनी गैरसमजूतीने पुन्हा कै. बसाप्पा सखाराम कुंभार यांना दि.२५/०८/१९८९ रोजी गट नं.१८९७/२ (सध्याचा गट नं. १५०८/२) व गट नं. १८९७/३( सध्याचा गट नं. १५०८/३) मधील क्षेत्र २७६ चौ.मी. क्षेत्र विक्री केलेले

आहे. सदर खरेदीदस्ताप्रमाणे वादी यांच्या वडीलांच्या नावाची नोंद गट नं. १५०८/३ व १५०८/२ च्या सदरी झालेली नव्हती. त्यामुळे वादी व प्रतिवादी नं.१ ते ५ यांचेत आपआपसातील प्रेमाचे व सोयऱ्याचे संबंध कायम रहावेत, त्यांच्यात कटुता राहु नये याकरीता वादाचा कंटाळा करुन गाव पातळीवरुन काही प्रतिष्ठित हितचिंतक व नातलगांच्या उपस्थितीत समोपचाराने दावा मिळकतीत तडजोड केली आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी आपआपसात तडजोड करुन घेतलेली आहे. दाव्यामध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी नं.१ ते ५ यांचेमध्ये भविष्यात वाद वितुष्ठ तक्रार राहु नये, त्यांचेमध्ये चांगले हितसंबंध प्रस्तापित व्हावे, याचा सारासार विचार करुन सदरचा दावा यातील वादी व प्रतिवादी नं १ ते ५ यांनी आपआपसात तडजोड करुन खालील नमुद पुरसीसीप्रमाणे मिळकतीचे वाटप करुन कब्जा घेतलेला आहे.

**२) वादी नं. १ श्री.भिमाप्पा बसाप्पा कुंभार, वादी नं. २ श्रीमती वैशाली महादेव कुंभार, वादी नं. ३ कु. ओंकार महादेव कुंभार यांना प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी तडजोडीप्रमाणे गट नं. १५०८/१ मधील सोडलेले क्षेत्र खालीलप्रमाणे–**

अ)**शेतमिळकती**: १) जिल्हा सांगली तालुका व पोटतुकडी कवठेमहांकाळ पैकी मौजे कवठेमहांकाळ येथील गट नं.१५०८/१ क्षेत्र २ हे. ११.२० आर, आकार १ रु. ०८ पैसे ची शेतमिळकत पैकी प्रतिवादी नं. ३ यांचे क्षेत्र १ हे. २०.७८ आर, आकार ० रु.६२ पैसे पैकी क्षेत्र २७६ चौ. मी. वादीस वाटणीस आलेले आहे. यासी चर्तु:सिमा खालीलप्रमाणे–

पुर्वेस – डॉ. कुणाल साळुंखे यांची मिळकत

पश्चिमेस – १५ फुटी रस्ता व त्यास लागून शकील तांबोळी यांची घरमिळकत

दक्षिणेस – मोहनानी यांची घरमिळकत

उत्तरेस – पप्पूबाई साळुंखे यांची घरमिळकत

येणेप्रमाणे वरील चतु:सिमेतील दगड, माती, पाषाण, वादी यांचे घर इत्यादी तदृंगभूत वस्तुसहित व सर्व इजमेंटरी हक्कासहित मिळकत.

२) वर नमुद गट नं.१५०८/१ ही प्रतिवादी नं.३ यांना वाटपाने आलेले मिळकत आहे. त्याप्रमाणे त्यांच्या नावाची नोंद वर नमुद मिळकतीच्या ७/१२ पत्रकी फेरफार नं. २७१८१ ने झालेली आहे. सदर मिळकतीमधील २७६ चौ.मी इतके क्षेत्र प्रतिवादी नं. ३ यांनी वादी यांना सोडलेले आहे. सदर क्षेत्राबाबत प्र.वादी नं.१ ते ३ यांची तक्रार नाही. सदर वर नमुद चतु:सिमेतील क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी नं.१ ते ३ यांचे वडिल कै. विठ्ठल गंगाराम माळी यांनी वादी यांचे वडील कै. बसाप्पा सखाराम कुंभार यांना खरेदीपत्रावेळी सन १९८९ साली दिलेला आहे. सदर मिळकतीचा वापर वादी यांनी वंशपरंपरेने मालकी हक्काने, निरंतर करणेचे आहे. सदर तडजोड नाम्याद्वारे वादी यांचे नांव वर नमुद क्षेत्राचे सदरी लागणेस प्र.वादी नं.१ ते ३ यांची हरकत अगर तक्रार नाही. वादी हे सदर तडजोड नाम्याच्या आधारे वर नमुद क्षेत्राचे मालक झाले आहेत. वादी यांनी पुर्वीचा गट नं.१८९७/३ व १८९७/२ मधील २७६ चौ.मी. इतके क्षेत्र खरेदीदस्त नं.८९/१९८९ ने दि.२५/०८/१९८९ रोजी खरेदी घेतले होते. सदर खरेदीपत्रातील नमुद गटाचा सध्या नवीन नंबर पडला असून सध्या गट नं.१८९७/३ चा नवीन गट नं.१५०८/३ असा असून गट नं.१८९७/२ चा

नवीन गट नं.१५०८/२ आहे. परंतु सदर खरेदीपत्र झालेनंतर वादी यांनी सदर गटामध्ये घर न बांधता त्यांनी गट नं.१५०८/१ मध्ये म्हणजेच वर नमुद मिळकतीमध्ये घर बांधलेले आहे व त्यांची नोंद ग्रामपंचायत असेसमेंट झालेली आहे. त्यामुळे वादी यांनी गट नं.१५०८/२ मधील खरेदीपत्राने आलेला हिस्सा हा प्र.वादी नं.१ ते ३ यांना सोडलेला आहे व गट नं.१५०८/३ मधील खरेदीपत्राने आलेला हिस्सा प्र.वादी नं.४ व ५ यांना सोडलेला आहे. त्याबाबत वादी यांची कोणतीही तक्रार नाही. सध्या प्र.वादी नं.१ ते ३ यांची नांवे गट नं.१५०८/२ च्या ७/१२ सदरी नोंद आहेत. सदर नोंदीबाबत वादी यांनी कोठेही तक्रार अगर दावा कोणत्याही कोर्टामध्ये करणेचे नाही. तसेच प्र.वादी नं. १ ते ३ व प्रतिवादी नं.४ व ५ यांची नांवे गट नं.१५०८/३ च्या ७/१२ सदरी नोंद आहेत. सदर नोंदीबाबत वादी यांनी कोठेही तक्रार अगर दावा कोणत्याही कोर्टामध्ये करणेचे नाही. वादी यांच्या वडीलांनी कै. बसाप्पा सखाराम कुंभार यांनी प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे वडील कै. विठ्ठल गंगाराम माळी यांचेबरोबर दि.२५/०८/१९८९ रोजी केलेला दस्त क्र.८९/१९८९ चा खरेदीपत्राचा दस्त या तडजोड नामेद्वारे रद्दबादल समजणेचे आहे. सदर खरेदीपत्राच्या आधारे वादी यांनी भविष्यात प्र.वादी विरूध्द कोठेही मालकी हक्काबाबत, नोंदीबाबत तक्रार अगर दावा करणेचे नाही.

**३)प्रतिवादी नं.१ श्रीमती शोभा विठ्ठल माळी, प्रतिवादी नं. २ सौ. सीमा अशोक माळी, प्रतिवादी नं. ३ श्री.सचिन विठ्ठल माळी यांना तडजोडीने आलेली मिळकत खालीलप्रमाणे-**

अ)**शेतमिळकती**:-१) जिल्हा सांगली तालुका व पोटतुकडी कवठेमहांकाळ पैकी मौजे कवठेमहांकाळ येथील गट नं.१५०८/२ (पुर्वीचा गट नं.१८९७/२) क्षेत्र १३० चौ.मी, आकार २ रु.६० पैसे. ची मिळकत

येणेप्रमाणे वरील चतु:सिमेतील दगड, माती, पाषाण इत्यादी तदंगभूत वस्तुसहित व इजमेंटरी हक्कासहित मिळकत.

२) जिल्हा सांगली तालुका व पोटतुकडी कवठेमहांकाळ पैकी मौजे कवठेमहांकाळ येथील गट नं.१५०८/३ (पुर्वीचा गट नं.१८९७/३) क्षेत्र १५० चौ.मी, आकार १५ रु.०० पैसे. पैकी २१.३० चौ.मी ची मिळकत .

येणेप्रमाणे वरील चतु:सिमेतील दगड, माती, पाषाण इत्यादी तदंगभूत वस्तुसहित व इजमेंटरी हक्कासहित मिळकत. कवठेमहांकाळ येथील गट नं. १५०८/३ (जुना गट नं. १८९७/३) मधील क्षेत्र १५० चौ.मी असून त्यापैकी प्रतिवादी नं. १ ते ३ चे वडील कै. विठ्ठल गंगाराम माळी यांनी सदर क्षेत्रापैकी १२८.७ चौ.मी क्षेत्र प्रतिवादी ४ व ५ यांना १९८९ साली विक्री केलेले आहे. सदर विक्री केलेले क्षेत्र सोडुन सदर गटांमध्ये २१.३० चौ.मी इतके क्षेत्र शिल्लक आहे. सदर क्षेत्राबाबत प्रतिवादी ४ व ५ यांची तक्रार नाही. सध्या सदर गटांतील क्षेत्र २१.३० चौ.मी इतक्या क्षेत्रास प्रतिवादी १ ते ३ यांच्या नावांची सातबारा सदरी नोंद आहे. त्याबाबत वादी व प्रतिवादी तक्रार नाही.

३) वर नमुद मिळकतीच्या सदरी सध्या प्र.वादी नं.१ ते ३ यांची नांवे वारसाने लागलेली आहेत. त्याबाबत वादी यांनी भविष्यात कोठेही तक्रार करणेची नाही. वर नमुद मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. १ ते ३ यांचा

पुर्वीपासुन कब्जा व वहिवाट आहे. त्याबाबत वादी व प्रतिवादी यांची कोणतीही तक्रार नाही.

४) यातील प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी वादी यांना दावेतील नमुद वादमिळकतीच्या बदल्यात गट नं.१५०८/१ मधील क्षेत्र २७६ चौ.मी इतके क्षेत्र सोडलेले आहे. सदर क्षेत्राचा कब्जा सन १९८९ साली ऑगस्ट महिन्यात खरेदीपत्रावेळी वादी यांना दिलेला आहे. सदर मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वादी यांचे नांव तडजोड नाम्याद्वारे लागणेस प्र.वादी नं.१ ते ३ यांची कोणतीही हरकत नाही. वादी हे सदर तडजोड नाम्याच्या आधारे वर नमुद मिळकतीचे मालक झाले आहेत. त्यामुळे वादी यांनी पुढे सदर मिळकतीमध्ये मालकी हक्काने वहिवाट करणेचे आहे.

**४) प्रतिवादी नं.४ श्री. रामचंद्र मारूती जगताप व प्रतिवादी नं. ५ श्री. रघुनाथ मारूती जगताप यांना तडजोडीने आलेली मिळकत खालीलप्रमाणे-**

**मिळकतीचे वर्णन :-( खरेदीपत्राप्रमाणे)१)** जिल्हा तुकडी व जिल्हा परिषद सांगली पैकी तालुका व पोटतुकडी व पंचायत समिती कवठेमहांकाळ पैकी कवठेमहांकाळ ग्रामपंचायत हद्दीतील कवठेमहांकाळ गांवाचे उत्तर दिशेची बिगरशेती प्लॉट जागा तिचे वर्णन कवठेमहांकाळ गट नं.१८९७/३ पैकी बिगरशेती प्लॉट नं.११ पैकी उत्तरेकडील बिगरशेती प्लॉट जागा तिचे माप-लांबी पुर्व-पश्चिम १८ मीटर, दक्षिण-उत्तर ७.१५ मीटर यांची एकूण चौ.मी १२८.७ यांचा बिगर शेती आकार २ रु.७० पैसे यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस - प्लॉटमधील रस्ता

पश्चिमेस - गट नं.१८९७ पैकी प्र.वादी यांची जमिन

दक्षिणेस - प्लॉट नं.११ चव्हाण यांची जागा

उत्तरेस - प्लॉट नं.१२

वरील प्लॉट जागा संपूर्ण हक्कासह दिली आहे.

२) सदर मिळकत ही प्र.वादी नं.४ व ५ यांच्या खरेदीपत्रापासून कब्जे व वहिवाटीत आहे. सदर मिळकतीमध्ये प्र.वादी नं.४ व ५ यांनी घर बांधलेले आहे. सदर घराची नोंद नगरपंचायत कवठेमहांकाळ यांचेकडे असेसमेंट लिस्ट उताऱ्यास झालेली आहे. वर नमुद मिळकतीच्या ७/१२ सदरी प्रतिवादी नं. ४ व ५ यांच्या नावाची नोंद फेरफार क्र. ७५८४ ने झालेली आहे.

५) वरील तडजोडीप्रमाणे सध्या प्र.वादी नं.१ ते ५ यांची गट नं.१५०८/२ व १५०८/३ च्या ७/१२ सदरी नांवे आहेत. त्याबाबत वादी यांनी भविष्यात कोणतीही तक्रार करणेची नाही.

६) वर नमुद तडजोडीप्रमाणे या पुढील काळात वहिवाटी ठेवण्याच्या आहेत. सदर तडजोडीमध्ये नमुद मजकुर हा त्यांच्या सामोपचाराने, समजुतीने ठरलेला असुन, सर्वांनी तो मान्य केलेला आहे. त्याबाबत कोणावरही, कोणताही दबाव कधीही नव्हता व नाही. सदर तडजोड नाम्यामध्ये ठरलेल्या सर्व अटी व शर्ती वादी व प्रतिवादी नं.१ ते ५ यांच्या सर्व वाली वारसांवर बंधनकारक राहतील. भविष्यात वर नमुद मिळकतीबाबत काही वाद उपस्थित झालेस तडजोडनाम्याच्या आधारावर सोडवुन घेणेचे आहे. अगर अशाप्रकारचा कोणताही वाद उपस्थित झालेस वादी व प्रतिवादी यांना दिवाणी न्यायालयात दरखास्त दाखल करुन अगर सि.पी.सी. कलम ५४ प्रमाणे दाद मागणेचा संपुर्ण हक्क राहील. वरील तडजोडीप्रमाणे वरीलप्रमाणे

जमिनीच्या ७/१२ पत्रकी वादी व प्रतिवादी यांच्या नावाच्या नोंदी करणेच्या आहेत.

उभय पक्षकारांनी वर नमुद तडजोडीमधील अटी व शर्ती संमतीने मान्य केलेल्या आहेत. त्याबाबत त्यांच्यावर कोणाचाही दबाव नाही.

सही–१)....................
२)....................
३)....................

अर्जदार/फिर्यादी/वादी

सही–१)....................
२)....................
३)....................
४)....................
५)....................

गैरअर्जदार/आरोपी/प्रतिवादी

....................

अर्जदार/फिर्यादी/वादी

....................
....................

गैरअर्जदार/आरोपी/प्रतिवादी

सही–....................
न्यायिक अधिकारी (पॅनल प्रमुख)

सही–....................
विधिक्ष (पॅनल सदस्य)

विधी सेवा समिती/प्राधिकरण शिक्का

स्थळ : कवठेमहांकाळ

दि.१४/०३/२०२६

## अवार्ड

सदरचा दावा हा दिवाणी स्वरूपाचा आहे. सदर दावा दि.१४/०३/२०२५ रोजी कवठेमहांकाळ येथील लोक अदालतमध्ये वरील अटी व शर्तीनूसार तडजोड झालेली आहे.

१) कवठेमहांकाळ येथील दि.२५/०८/१९८९ रोजीचा खरेदीदस्त क्रं.८९/१९८९ हा रद्द करणेचे उभय पक्षकारांनी ठरवले असल्याने खरेदीदस्त रद्द झाले असल्याची नोंद घेणेसाठी कवठेमहांकाळ येथील सबरजिस्टर ऑफिस कवठेमहांकाळ यांचेकडे प्रस्तुतचा अवार्ड पाठवण्यात यावा.

२) कवठेमहांकाळ येथील गट नं.१५०८/१ मधील क्षेत्र २७६ चौ.मी. यासी चतु:सीमा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | डॉ. कुणाल साळुंखे यांची मिळकत |
| पश्चिमेस | - | १५ फुटी रस्ता व त्यास लागून शकील तांबोळी यांची घरमिळकत |
| दक्षिणेस | - | मोहनानी यांची घरमिळकत |
| उत्तरेस | - | पप्पूबाई साळुंखे यांची घरमिळकत |

इतके क्षेत्राबाबत मे.तहसिलदारसो, कवठेमहांकाळ यांनी सदर मिळकतीबाबत योग्य ती स्टॅम्पड्युटी भरून घेवून वादी यांच्या नांवाची नोंद करण्याची आहे.

म्हणून वादी व प्रतिवादीमध्ये लोकन्यायालयात झालेल्या तडजोडीनूसार दावा निकामी करण्यात येत आहे.

पक्षकारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी कोर्ट फी (भरली असल्यास) कायद्याप्रमाणे व नियमाप्रमाणे त्यांना परत करण्यात येईल.

सही-........14/3/26...                सही-.......................

न्यायिक अधिकारी (पॅनल प्रमुख)                विधिज्ञ (पॅनल सदस्य)

विधी सेवा समिती/प्राधिकरण शिक्का

स्थळ: कवठेमहांकाळ

दिनांक : १४/०३/२०२६